चांदा ते बांदा योजने अंतर्गत सन २०१८-१९ साठी मागणी क्र.ओ-७, (३४५१A०१९) अंतर्गत "१०,कंत्राटी सेवा" व "२६,जाहिरात व प्रसिध्दी" या उद्दीष्टाखाली निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: चांबांयो-२०१८/प्र.क्र.४४/का.१४१८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- १६ मार्च, २०१९.

वाचा:
१) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१५/प्र.क्र.५१/का.१४८१, दि. २९.०६.२०१६.
२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. डिएपी-१०१६/प्र.क्र.१८६/का.१४८१, दि. १८.११.२०१६.
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. चांबायो-२०१८/प्र.क्र.७८/का.१४१८, दि.१६.०३.२०१९.
४) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दि.०२.०४.२०१८.
५) जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाचे पत्र क्र. PLAN-चांदा ते बांदा/३७०२, दि.१२.०३.२०१९ व ३७०५, दि.१३.०३.२०१९.

शासन निर्णय:

नियोजन विभाग, शासन निर्णय संदर्भाधिन क्र.१ अन्वये चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होण्यासाठी सधन नियोजन व अंमलबजावणीचा विशेष कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने चांदा ते बांदा या योजनेस शासन मान्यता देण्यात आली आहे. नियोजन विभाग, शासन निर्णय संदर्भाधिन क्र.२ अन्वये चांदा ते बांदा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी "जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष" स्थापन करण्यात आला आहे. सदरहु कक्षामध्ये विविध संवर्गामध्ये पदे निर्माण करण्यात आली आहेत.

२. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी संदर्भीय पत्र क्र.५ नुसार चांदा ते बांदा योजनेंतर्गत लेखाशीर्ष "मागणी क्र. ओ-७, ३४५१A०१९" अंतर्गत "(१०) कंत्राटी सेवा" या उद्दीष्टातून जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षातील दोन कार्यालयीन सहायकांच्या मानधनासाठी व "(२६) जाहिरात व प्रसिध्दी" या उद्दीष्टातून दि.०१.०१.२०१९ व दि.०५.०३.२०१९ रोजी वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिरातीच्या खर्चासाठी आवश्यक निधीची मागणी केलेली आहे.

३. सन २०१८-१९ या वित्तिय वर्षासाठी मागणी क्र.ओ-७, लेखाशिर्ष "३४५१-सचिवालय आर्थिक सेवा, ०९०-सचिवालय, (०५) चांदा बांदा विशेष कार्यक्रम, (०५) (०१) चंद्रपूर व सिंधुदुर्ग या जिल्ह्यामध्ये साधन संपत्तीवर आधारीत सधन नियोजन व विकास कार्यक्रम राबविणे (३४५१A०१९)" या अंतर्गत "१०, कंत्राटी सेवा" व "२६,जाहिरात व प्रसिध्दी" या उद्दीष्टाखाली जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी वर नमुद केलेल्या बांबीसाठी मागणी केल्यानुसार "जिल्हा नियोजन अधिकारी तथा नियंत्रक अधिकारी, सिंधुदुर्ग" यांना पुढीलप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

लेखाशिर्ष व उद्दीष्ट	सिंधुदुर्ग जिल्हा (रू.हजारात)
	वितरीत करावयाचा निधी
१०, कंत्राटी सेवा	२२.२९
२६, जाहिरात व प्रसिध्दी	६८०.००
एकुण	**७०२.२९**

४. “जिल्हा नियोजन अधिकारी तथा नियंत्रक अधिकारी, सिंधुदुर्ग” यांनी “१०, कंत्राटी सेवा” या उद्दीष्टाखाली रु.२२,२९०/- (रु.बावीस हजार दोनशे नव्वद फक्त) व “२६,जाहिरात व प्रसिध्दी” या उद्दीष्टाखाली रु.६,८०,०००/- (रु.सहा लक्ष ऐंशी हजार फक्त) इतके अनुदान “आहरण व संवितरण अधिकारी तथा सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, सिंधुदुर्ग” यांना वितरीत करावे. “आहरण व संवितरण अधिकारी व सहायक जिल्हा नियोजन अधिकारी, सिंधुदुर्ग” यांनी मंजुर करण्यात आलेले अनुदान उद्दीष्टनिहाय व विहीत मर्यादेत खर्च करावे. त्याचप्रमाणे मंजुर अनुदानापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी.

५. या आदेशान्वये उपलब्ध करुन देण्यात येत असलेले अनुदान हे मासिक निधी विवरण पत्रानुसार (Cash Flow Statement) करण्यात येत आहे.

६. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय, महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम-२०१५ निधी वितरण या विषयी वित्त विभागाने निर्गमित केलेले शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/ प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ मधील तरतूदी/निर्देशानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. नियोजन विभागाचा हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३१६१६४८१२०२१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIJESING FATTESING VASAVE

Digitally signed by VIJESING FATTESING VASAVE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PLANNING DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=5494d2ad3a3bc5ddd66daf9a8f17ceec5e2d7d4b6a8bba99c51d275801bcdf1b, cn=VIJESING FATTESING VASAVE
Date: 2019.03.16 16:55:11 +05'30'

(वि.फ.वसावे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर.
३) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
४) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
५) जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.
६) उपायुक्त (नियोजन), विभागीय आयुक्त कार्यालय, नवी मुंबई.
७) जिल्हा कोषागार अधिकारी, सिंधुदुर्ग.
८) जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, सिंधुदुर्ग.
९) वित्त विभाग, अर्थ-१६, मंत्रालय, मुंबई,
१०) प्रकल्प संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) जिल्हा समन्वयक, चांदा ते बांदा जिल्हा व्यवस्थापन कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग.
१२) निवड नस्ती / कार्यासन १४१८.